Val II, Issue:VIII, Sept 2012
ISSN : 2230-7850

# Indian Streams Research Journal

## Monthly Multidisciplinary Research Journal



Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N. Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 8, Sept 2012
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# आगरी लोकगीते एक परंपरा

समृध्दी बाळासाहेब म्हात्रे

**प्रस्तावना :–**

लोकवाड्.मयात अतिशय लोकप्रिय व प्रसिध्द असलेला प्रकार म्हणजे लोकगीत. लोकगीत हा लोकसाहित्याचा आत्मा आहे. आगरी लोकगीत ही फार पूर्वीपासून या समाजात प्रचलित आहेत. जीवन जगताना विधीआचरण प्रसंगी, संस्कार विधीप्रसंगी, दळण कांडण, कृषीकर्म करताना आणि सण–उत्सव प्रसंगी आगरी लोकगीतांची निर्मिती झाली आहे. आगरी माणूस परंपराप्रिय असल्यामुळे या समाजात लोकगीतांची विशेषतः स्त्री गीतांची संख्या अधिक आहे. अशा लोकगीतांची विविधता, त्या लोकगीतांचे वेगळेपण व त्यातून आगरी समाजाची दिसून येणारी वैशिष्टये या सर्वाचा परामर्श प्रस्तुत शोधनिबंधात घेतलेला आहे.

आगरी हा शब्द आगर म्हणजे नारळी–पोफळी भात, भाजीपाला, फुले , मीठ पिकविण्याची जागा यावरुन आगर पिकविणारा, आगरावर उपजिविका करणारा तो आगरी. भातशेती करणे, बागा पिकविणे, मीठ तयार करणे हे हया समाजाचे मूळ उद्योग. दर्यावरचा कोळी, माळावरचा माळी यांच्यामध्ये आगरातला आगरी अशी हया समाजाची वसाहत येते. आगरी समाज हा मूलतः कष्टकरी, शेतीनिष्ठ समाज आहे. भातशेती आणि मिठागरे यांच्याशी त्यांचा मूलतः संबंध आहे ,आगर पिकविणारा आगरी या न्यायाने ठाणे, कुलाबा (रायगड), मुंबई, नवीमुंबई येथला मूळ समाज हा आगरी समाज आहे.

आगरी लोकगीते ही समाज जीवनाचा आरसाच आहेत . ओव्या, धवळे, विविध सणांची गीते, पालखीची गाणी, शेतातील गाणी, बायांची गाणी इत्यादी सर्व गीतांतून त्या त्या वेळच्या समाजाच्या चालीरीती, रुढी, व परंपरा यांची वर्णने आढळतात. स्त्रियांनी परंपरेने चालत आलेले हे धन मौखिक स्वरुपात जपले आहे व लोकगीतांची विविधता व माधुर्य टिकवून ठेवून ही परंपरा जपली आहे.

रायगड जिल्हयातील उरण तालुक्यात क्षेत्र अभ्यासादरम्यान सणांच्या निमित्ताने आगरी समाजात गायली जाणारी लोकगीते आढळली ती पुढील प्रमाणे.

***नागपंचमी :–***

श्रावण महिन्यातील या पहिल्या सणांच्या दिवशी आगरी स्त्रिया वारुळाला नागोबाला पूजायला जातात त्यावेळी पुढील गीत गातात

नागपंचमीचा सन गाऊ
मनी भाव धरुन
नमस्कार करुन पसरु पदर वर घ्यायाला
नागपंचमीचा सन गाऊ
वृक्षांच्या फांदयाना
बांधू हिंदोले
हासत नाचत करु सोहले
असे गीत गातात.

**Please cite this Article as :** *समृध्दी बाळासाहेब म्हात्रे , आगरी लोकगीते एक परंपरा* **: Indian Streams Research Journal (Sept. ; 2012)**

***गणपती :–***

भाद्रपद शुध्द चतुर्थीच्या दिवशी गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते यावेळी गावातील स्त्रिया एकत्र येऊन गोल फेर धरुन नाचतात अशा वेळी देवांची गाणी गातात.

उदा :–

उंदीराचा घोरा रं
गणपती देवा तुझा
उंदीराचा घोरा रं
उंदरावर बैसला गं
गणपती देवा माझा
उंदरावर बैसला गं
इंदराचे दरबारी गं
तो देव गेला
इंदराचे दरबारी गं

असे गीत समूहात गाऊन स्त्रिया आनंदाने फेर धरतात.

***गौरी :–***

गौरीच्या सणाच्या वेळीचा आनंद तर अतिशय वेगळाच असतो या आनंदाचे वर्णन पुढील गीतात केले आहे.

गौरीचा सन आयलाय तुम्ही सनाला चला
गौराई पाहुनी आपुल्या आली घराला
गौरीला बसाया पाट चंदनी दिला
गौराई मातेला आपण श्रृंगारु चला
असे गीत गातात.

***होळी :–***

होळी हा सण आगरी समाजात पारंपारिक पध्दतीने साजरा केला जातो या सणाच्या वेळी सासूरवाशीणीला अगत्याने माहेरी आणतात त्यावेळेचे गीत

वाटन जातियार वाटस–या दादा कार
आवरा निरोपूर सांग माझे आय बाला र
शिमग्याचे सनाला र ये मना न्हेवाला र
तुझी ये आय बाचा गो घर कसा घावल गो
आय बाचे घराला र भिंती हाईत गुल्लालाच्या
आय बाचे घराला रं वंबना चंदूनाची

असे आपल्या माहेरच्या घराचे कलात्मक वर्णन सासरी गेलेली मुलगी करते.
केवळ सणांचीच नव्हे तर श्रमपरिहाराची गाणी, ओव्या, अंगाई गीते, बायांची गाणी, धवळे अशी विविध गीते स्त्रिया गाताना आढळतात व गीत गायनाचे प्रमाण स्त्रियांमध्ये अधिक आढळते.

***श्रमपरिहारांची गीत :–***

श्रम हे कोणालाच चूकले नाहीत स्त्री असो वा पुरुष प्रत्येकजण शेतात काम, मेहनत करीत असतो व या कामाचा आलेला थकवा गीत गायनाने दूर होतो व कामही अधिक वेगाने होते.
उदा :–

शेतकरी दादा कामकरी दादा
चला रे उठा रे
शेतकरी दादा कामकरी दादा
गुरघा गुरघा चिखलात
काम करुया
झपा झपा झपाझपा
शेतात जाऊया
शेतकरी दादा कामकरी दादा
असे गीत गातात.

ओव्या :– आगरी स्त्रियांच्या ओव्या हे त्यांच्या अंतर्मनाचे सहजोद्‌गार आहेत जे इतर कोणाकडे प्रकट बोलता येत नाही तेच काम करीत असताना ओवीतून प्रवाहित होत राहते.
उदा :–

पहिली माझी ओवी ग
माझ्या आईबापाला
त्याही जन्म दिला मला गोईंद गोईंद
दुसरी माझी ओवी ग
धरतरी मातेला
तिही ठाव दिला आपल्याला
सर्व जगताला
असे गीत स्त्रिया गातात

***अंगाई गीत :–***

आगरी स्त्री आपल्या बाळाला निजविताना पुढील गीत गाते :–

उदा :–

कोल्हया कोल्हया काय करतंस ε काय करतंस ?
आमचा बालू गाय करतंय, गाय करतंय
कोल्हया कोल्हया नको यंव, नको यंव
आमच्या बालूला झोप येतंय, झोप येतंय
कोल्हया कोल्हया कय चाललास, कय चाललास
आमच्या बालूनी गाय केला, गाय केला.

असे मधूर आगरी बोलीतील गीत गाऊन आई आपल्या तान्हयाला निजविते.

***बायांची गाणी :–***

पूर्वी दूषित पाण्यामुळे, प्रदुषणामुळे , भ्रामक समजुतीमुळे देवींचा रोग, साथीचा रोग गावोगाव पसरत, आगरी माणूस अतिशय श्रध्दाळू त्यामुळे हा रोग नसून देवीचा कोप आहे त्याची शांती करायला हवी म्हणून गाण्यातून देवीचे गुणगान केले जाई त्याला बायांची गाणी असे संबोधले जाई.
उदा :–

दूधा विकाला जाती ग बाया
राधिका गवलनी
दूधा विकाला जाती ग बाया
उरनच्या टेशनावरी
दूधा विकती घरोघरी
पैका घेती हातावरी
तुम्हाला हाये पैका बायांनो
आम्हाला काय दयाल
हे गीत गातात.

वरील सर्व गीतांबरोबरच आगरी समाजात लग्नविधींच्या वेळी गायल्या जाणा–या धवला गीतांना अनन्यसाधारण महत्त्व आहे व ही धवला गीते गाणारी श्धवलारीणश म्हणजे जणू काही मंगल विधी प्रसंगी पुरोहित्य करणारी ब्राहमण होय. आगरी समाजाने धवला गीतांची परंपरा जपली आहे व हया परंपरेच्या मूळाचा विचार केल्यास ते आपल्याला महानुभाव पंथात सापडते. श्धवळेश हा शब्द धवल या संस्कृत शब्दावरुन आलेला आहे. धवल ( धव–वर, ल–स्वार्थे ) म्हणजे विवाहात गायले जाणारे वर विषयक गीत होय. धवळे लिहिणारी चक्रधर शिष्या महदंबा ही मराठीतील आद्य कवयित्री मानली जाते. तिने आपले संपूर्ण आयुष्य महानुभाव पंथाच्या प्रचारार्थ वेचले.

महानुभाव पंथात महदंबेचे धवळे प्रसिध्द आहेत. धवळे म्हणजे लग्न प्रसंगी गावयाचे विवाहविषयक गीत होय. या धवळयांच्या निर्मितीमागे अशी घटना आहे की एकदा गोविंदप्रभूंना विविह प्रवृत्ती झाली तेव्हा त्यांनी महदंबेला विवाहविषयक गीते म्हणावयास सांगितली. या गीतात विवाहाच्या प्रारंभापासून अखेरपर्यंत वर्णन करण्यात आले आहे. साधे वर्णन, साधे विचार व साधी भाषा हे त्याकाळी महदंबेने रचलेल्या धवळयाचे वैशिष्टय आहे.

महदंबेचा धवळा पुढील प्रमाणे.

श्री. चक्रधरांचे शीरी, धरौनिय श्री चरणा ।।
मग धवळे गाऊनिया गोविंदा राणा ।।
जेणे रुक्मिणी हरितळी ।।
तेणे जगी पवाडे केले अती बहुतू ।।
पाविजे परमा गती ।।
भक्ती आइकिता श्रीकृष्ण चरितु ।।11।।

अशा प्रकारे सहा चरणांचे धवळे महदंबेने रचलेले दिसतात.

वरील महदंबेच्या धवळयांचा वारसा आगरी समाजाने जपलेला आहे.

आगरी लग्नविधी पूर्वी पाच दिवस परंतु आता तीन दिवस असतात. लग्नाचा पहिला दिवस म्हणजे चूनाचा दिवस होय. श्चूनश म्हणजे घा–या (वडे) करण्याकरिता लागणारे दळण, चून दळण्याकरिता कुंटुबातील, शेजारील सुवासिनी येतात जात्याला हळद कुंकू लावतात मग जात्यावर दळण दळतात त्यावेळी धवलारीण पुढील गीत गाते.

चुनू गो मलाया
चांदाने चांदनी पाठविली
चुनू गो मलाया
शंकराने पारबती धारिली
चूनु गो मलाया
रामाने जानकी धारिली
लाल पागोटे मोत्याच तूरं
देव चून दलाया आले

अशा प्रकारे चून दळायला सर्वच देवांच्या पत्नी आनंदाने सहभागी होतात असा विश्वास धवलारणीला आहे.

लग्नाचा दूसरा दिवस हळदीचा या हळदीच्या दिवशी कुंटुबातील सर्व आप्तेष्ट, मित्र, मैत्रिणी, नवरा/नवरीला हळद लावावयास येतात त्यावेळी धवलारीण पुढील गीत गाते.

हाती घेतिला गाईचाच शेनु ग
हाती घेतिला गंगेचाच उदकू ग
तया सारविली धरतरी अस्तुरी ग
हाती घेतिला कनिकाचा पिठू ग
कनक पिठाच मोरील चवकू ग
चौकान ठेविला चंदनाचा पाटू ग
ऐसा यो गनेसू नोवूरा पाटा येऊन बैसला ग
सीतापती का माऊली येऊन मागे बैसली ग

या गीतातून हळद लावण्याच्या विधीचे वर्णन केले आहे व हळद लावणा–या प्रत्येक कुंटुबातील सदस्यांचे किंवा त्या नवरीला जो कोणी हळद लावील त्यांची नावे गीतातून घेतली जातात हे या गीताचे वैशिष्टयच म्हणावे लागेल.

हळदीच्या दिवशी दुपारी श्चून रासणेश हा विधी असतो. म्हणजेच लग्नासाठी आलेली सर्व मंडळी एकत्र येऊन दळलेले पीठ मळतात ते पीठ स्वच्छ कापडावर ठेवले जाते व सर्वजण गोलाकार बसून ते पीठ मळतात त्यावेळी धवलारीन पुढील गीत गाते

चुनू गं मलाया महादेव गावंड बोलवा
त्यांची माखली पाचही बोटा
त्यांच सुटलं पागरी पालव
त्यांना सुटलं निडाले घामू
जवली बोलवा ग राजश्रीबाई

अशी घरातील सर्व नातेवाईकांची नावे घेतली जातात.

तर हळदीच्या दिवशी संध्याकाळी तेलवणा करुन मांडवथापनी केली जाते त्यावेळी धवलारीन पुढील गीत गाते.

मांडवथापनी कशीयाने होते हो
मांडवथापनी दोघा मुरत्यांनी हो
मांडवथापनी आंबियाचे ठाली हो
मांडवथापनी जांभूलिचे ठाली हो
मांडवथापनी हल्दी काय कुकवानी हो
मांडवथापनी नारला काय फोपलानी हो
मांडवथापनी खारका बदामानी हो

अशा प्रकारे मांडवथापनीसाठी काय काय साहित्य लागते याचे वर्णन केले आहे व त्यानंतर तवा चढवतात व या विधी प्रसंगी तव्यात फेण्या व घा–या तळल्या जातात. त्यावेळी धवलारीण गाते

तवा तेलवण कराया
शंकर पारबती येती
तवा तेलवण कराया
राम सीता दारी येती

हे गीत गाऊन आधी देव देवतांचे स्मरण करते व नंतर कुंटुबातील तिथे उपस्थित असलेल्या सर्वांची नावे घेतली जातात.

तिसरा दिवस लग्नाचा या दिवशी नवरीला वान देतात, त्यावेळी धवलारीन पुढील गीत गाते.

मालनीचे मल्यामंदी फुलेल्या रुई
भरली वाना घेऊन आली
खंडोबा देवाची बानायवाई
भरली वाना घेऊन आली
इठ्ठल देवाची रुखमिनी
त्यागो याती भरली वाना
बाय देते गो आठवार वाना

नववधूंना चांगले सौभाग्य लाभावे, तिच्या पतीला दिर्घायुष्य मिळावे म्हणून सुवासिनी तिला वानाच्या रुपाने आशीर्वाद देतात.

यानंतर श न्हाव पडण्याचा श (नाहु घालण्याचा ) विधी असतो त्यावेळी नव–याला / नवरीला मांडवात बसवून आंघोळ घातली जाते तेव्हा पुढील गीत गातात

पयली भवारी गणपतीला
दुसरी भवारी ब्रह्मदेवाला
तिसरी भवारी शंकर देवाला
चौथी भवारी इस्नु देवाला
पाचवी भवारी इठ्ठल देवाला

या विधीनंतर मामा भाचीसाठी ( नवरीसाठी ) बाशिंग व साडी आणतो त्यावेळी धवलारीन गाते

न्हायली धुतली ग
बाय बहुले बसली
कधी येतीरं मामा तुझी बाशिंगा
कधी येतीरं मामा तुझी कोलसाडी

असे गीत गाते. गावच्या ठिकाणी नवरा गावात फिरतानाही गाणी गातात. या सर्व विधी झाल्यावर देव उठवतात तेव्हा धवलारीण पुढील गीत गाते

आलं होतं देव तुमी
दांडिये डोले
आता देवानूं तुमी जावा
कुराचे गोंडे
आलं होतं देवानूं तुमी
धवले दिवशी
आता देवा तुमी जावा
कालिये राती

अशा प्रकारे मंगल कार्य निर्विघ्नपणे पार पाडावे यासाठी जसे देवांना आमंत्रित केले जाते तसे कार्य निर्विघ्नपणे पार पडल्यावर देवांची मानाने पाठवणी ही केली जाते यालाच श्देव उठवणेश म्हणतात. यावरुन आगरी समाजातील धवला गीतांची पंरपरा लक्षात येते.

आगरी समाजाला सण, उत्सव प्रसंगी गाण्याची एक चांगली व फार पूर्वीपासून लाभलेली पंरपरा आहे या सा–या सण व उत्सवांचे नाते निर्सगाशी, निर्सगातील ऋतुचक्राशी असलेले दिसून येते सण व उत्सव साजरे करताना विधीला महत्त्वाचे स्थान आहे हे विधी लोकगीते गाऊन साजरे करतात यातूनच मानवाच्या समुहात्मकतेचे भान येते. यातूनच ही लोकगीते सामूहिकता, पारंपारिकता व एकात्मता या त्रिविध घटकांनी परिपूर्ण आहेत असे लक्षात येते. परंपरा जपणारी लोकगीते इतक्या विपूल प्रमाणात असूनही त्यांचा प्रचार आणि प्रसार तरुण पिढीपर्यंत होणे अत्यंत गरजेचे आहे. इंग्रजीचा प्रभाव असलेल्या समाजाला आपल्या उत्कृष्ट परंपरांचा विसर पडू नये व या परंपरांचा वारसा नवपिढीने जतन करावा म्हणून प्रस्तुत शोधनिबंध !

***संदर्भ :–***

1)आगरी लोकगीते आणि परंपरा, श्रीमती सुनंदा मोडखरकर
2)आगरी समाजाचा इतिहास, मुरलीधर म्हात्रे
3)लोकसंस्कृतीचे उपासक, ढेरे. रा. चि.
4)आगरी समाज शोध आणि बोध, श्री. मोकल गोपीनाथ बाळाजी
5)लोकसाहित्य भाषा आणि संस्कृती , बाबर सरोजिनी
6)लोकसाहित्य क्षेत्रीय अभ्यास, डॉ. मोरजे गंगाधर
7)आगरी दर्पण (मासिक),( मार्च–एप्रिल–2012 ), संपादक दि. बा. पाटील

# Publish Research Article

**International Level Multidisciplinary Research Journal**

## For All Subjects

Dear Sir/Madam,

We invite original unpublished research paper. Summary of Research Projetc, Theses, Books and Books Review of publication, You will be pleased to know that our journals are..

### Associated and Indexed, India

- OPEN J-GATE
- International Scientific Journal Consortium Scientific

### Associated and Indexed, USA

- Google Scholar
- DOAJ
- EBSCO
- Index Copernicus
- Academic Journal Database
- Publication Index
- Scientific Resources Database
- Recent Science Index
- Scholar Journals Index
- Directory of Academic Resources
- Elite Scientific Journal Archive
- Current Index to Scholarly Journals
- Digital Journals Database
- Academic Paper Database
- Contemporary Research Index

Indian Streams Research Journal
258/34, Raviwar Peth Solapur-413005, Maharashtra
Contact:- 9595359435
E-Mail- ayisrj@yahoo.in / ayisrj2011@gmail.com
Website: www.isrj.net